सुवर्णाक्षरांनी नोंद व्हावी, अशी सरकारची कामगिरी

सहकार व नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे प्रतिपादन

नाशिक । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील मोदी सरकारची ११ वर्षे सेवा, सुशासन व गरीब कल्याणला समर्पित आहेत. आत्मनिर्भर भारत ते विकसित भारत या संकल्पाकडून सिद्धीकडे नेणारी ही ११ वर्षे असून जनकल्याणासाठी संकल्प, प्रयत्न आणि समर्पणाचा 'सुवर्णकाळ' मोदी सरकारमुळे सर्वांना अनुभवता येत आहे, असे प्रतिपादन केंद्रीय सहकार व नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केले.

ते वसंत स्मृती येथे आयोजित मोदी सरकारची अकरा वर्षे या विषयावर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, आ. सीमा हिरे, नाशिक महानगर जिल्हाध्यक्ष सुनील केदार, नाशिक जिल्हा दक्षिण ग्रामीण अध्यक्ष सुनील बच्छाव, प्रशांत जाधव, प्रदेश प्रवक्ते गोविंद बोरसे, प्रदेश प्रवक्ते प्रदीप पेशकर, सरचिटणीस नाना शिरेदार, दादा जाधव आदी उपस्थित होते. मोदी सरकारने मागच्या ११ वर्षांत केलेल्या अद्वितीय कार्याची नोंद सुवर्णाक्षरात केली जावी, अशा सहकार व नागरी उड्डाण केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी मोदी सरकारच्या ११ व्या वर्षपूर्तीनिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत मोदी सरकारच्या ११ वर्षांतील कार्याची प्रशंसा केली. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी मोदी सरकारने महिला, युवा, शेतकरी, दलित, आदिवासी, ओबीसी घटक यांच्या कल्याणासाठी आणलेल्या विविध योजना तसेच सरकारच्या कामगिरीचा आढावा घेतला.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या राजकीय संस्कृतीमध्ये आमूलाग्र बदल करत विकासाचे युग सुरू केले आहे. मागच्या ११ वर्षांत 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास' या मूलमंत्रानुसार मोदी सरकारने मोठे कार्य करत विकास, अनुसंधान आणि

सर्वसमावेशकतेला प्राधान्य दिले.

गेल्या ११ वर्षांत मोदी सरकारने घरे, शौचालये, गॅस जोडण्या, पेयजल, वीज, दरमहा ५ किलो धान्य ८१ कोटी जनतेला आणि ५ लाख रुपयांपर्यंत आरोग्य सुविधा देशातील गरीब, गरजू लोकांना उपलब्ध करून दिल्या आहेत. 'अंत्योदय' संकल्पनेनुसार, सरकारने समाजातील अखेरच्या घटकाच्या उन्नतीसाठी विविध योजना राबविल्या.

११ वर्षांत जगातील अर्थव्यवस्थांमध्ये भारताची अर्थव्यवस्था १० व्या स्थानावरून लवकरच चौथ्या स्थानावर पोहोचणार आहे. 'गतिशक्ती', 'भारतमाला', 'सागरमाला', 'इंडस्ट्रियल कॉरिडोर' यांसारख्या योजनांमुळे देशाच्या कानाकोपऱ्यात कनेटिव्हिटी पोहोचल्याने गुंतवणूकदार आकर्षित होत आहेत. 'वंदे भारत' स्वदेशी गाड्या क्रांती घडवत असून, गावागावांत इंटरनेट पोहोचते आहे. अशी अनेक ऐतिहासिक पावले मोदी सरकारने उचलली असल्याचे मोहोळ यांनी सांगितले .

व्यापारी बँकेचा नावलौकिक

नाशिकरोड । प्रतिनिधी

नाशिकरोड देवळाली व्यापारी बँकेमध्ये सहकाराच्या माध्यमातून सर्वपक्षीय लोक सभासदांची चांगल्या प्रकारे सेवा करतात. त्यामुळे व्यापारी बँकेचा नावलौकिक आणि समृद्ध वारसा मोठा आहे, हे बँकेच्या आकडेवारीवरून सिद्ध होते. इतर सहकारी बँकांनी नाशिकरोड व्यापारी बँकेचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केंद्रीय नागरी उड्डाण व केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केले.

मंत्री मोहोळ यांनी नाशिक दौऱ्यात येथील नाशिकरोड देवळाली व्यापारी सहकारी बँकेस सदिच्छा भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, केंद्रीय मंत्रिमंडळात सहकार खात्याची जबाबदारी मिळाल्यानंतर सरकारने दिलेली जबाबदारी म्हणून देशभर सहकार क्षेत्रातील बँका व संस्थांना भेटी देवून समस्या जाणून घेत आहे. सहकार क्षेत्रातील सरकारचे प्रभावी धोरणे देशभर पोहोचावे, त्याचाच एक भाग म्हणून नाशिकरोड देवळाली व्यापारी सहकारी बँकेस भेट दिली असल्याचे ना. मोहोळ यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्राची संपूर्ण देशभर ख्याती असून राज्याला सहकाराची मोठी परंपरा आहे. सहकार्य वाढवणे गरजेचे

बाब असल्याचे सांगून ते पुढे म्हणाले की, व्यापारी बँकेचे एकूण वाटचाल व सद्यस्थितीबाबत मंत्री मोहोळ यांनी समाधान व्यक्त करत हे सामूहिक यश असून इतर सहकारी बँकांनी व्यापारी बँकेचा आदर्श घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. सहकारातून विकास हा केंद्र सरकारचा उद्देश असून सहकार आणि विश्वासार्हता हे एकमेकांना पूरक आहेत. भविष्यात या बँकेला कधीही, कोणतीही अडचण असल्यास आपण मदतीसाठी तत्पर असल्याचा विश्वास याप्रसंगी त्यांनी दिला.

प्रारंभी बँकचे ज्येष्ठ संचालक निवृत्ती अरिंगळे यांनी प्रास्ताविकातून बँकेच्या यशस्वी वाटचालीचा आढावा सादर केला. तर बँकेचे अध्यक्ष दत्ता गायकवाड यांनी बँकची घोडदौड, बँकेला मिळालेले पुरस्कार, अधिकारी-कर्मचाऱ्याचे योगदान याबाबत विस्तृत माहिती दिली. तसेच बँकेचा कमी झालेला एनपीए आणि वाढणाऱ्या ठेवी यांचाही ऊहापोह केला. सूत्रसंचालन हेमा माळवे यांनी तर आभार संचालक सुनील आडके यानी मानले. याप्रसंगी भाजपाचे ज्येष्ठ नेते लक्ष्मण सावजी, उपनिबंधक फैयाज मुलानी, संचालक अरुण जाधव, मनोहर कोरडे, नितीन खोले, रमेश धोंगडे, योगेश नागरे, वसंत अरिंगळे, संचालिका रंजना बोराडे, कमल आढाव, तज्ज्ञ संचालक ॲड. सुदाम गायकवाड, कर्मचारी, प्रतिनिधी यशवंत पागेरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी एकनाथ कदम, उप महाव्यवस्थापक संजय हिंगे, मुख्य व्यवस्थापक लक्ष्मण गवळी, व्यवस्थापक मंडळ सदस्य हर्षदा पवार आदी उपस्थित होते.

आवर्जून भेट

खात्यांतर्गत माहिती घेवून ज्या बँकांचे कामकाज उत्कृष्ट आहे, त्या बँकांना मुद्दामहून भेट देवून तेथील कामकाजाची माहिती घेत असतो. त्यात नाशिकरोड देवळाली व्यापारी सहकारी बँक शंभर टक्के उत्तीर्ण झाली आहे. म्हणून या बँकेला आवर्जून भेट देण्यासाठी आलो असल्याचे मंत्री मोहोळ यांनी नमूद केले.

नाशिकची कनेक्टिव्हिटी वाढवण्यासाठी प्रयत्नशील

नाशिक । आगामी सिंहस्थ कनेक्टिव्हिटी वाढविण्यसाठी प्रयत्न करणार असून नाशिक नियोमेट्रोचे विचाराधीन आहे. पुणे-नाशिक कनेक्टिव्हीटी वाढविणार असल्याचे केंद्रीय राज्यमंत्री सहकार आणि नागरी विमान वाहतूक मुरलीधर मोहोळ यांनी बुधवारी मोदी सरकारची अकरा वर्षातील कार्याचा आढावा घेण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत माहिती दिली.

मोहोळ यांनी जिल्हा बॅक आणि सहकार राज्याशी संबधीत आहे. राज्य बँकेचे शिखर बँकेचे प्रशासक म्हणून काम करतात. त्यांच्याशी संपर्क करून अडचणीबद्दल जाणून घेणार असल्याचे मोहोळ यांनी सांगितले. अनेक राज्यातील सहकारी संस्था अडचणीत आहेत. त्याला केंद्रकडून मदत केली जात आहे. एका वर्षात ९ हजार कोटीपेक्षा जास्त रक्कम बँकेच्या पुनर्वसनासाठी महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रात मदत केली आहे. जिल्हा बॅक या लवकरात लवकर पूर्ववत कार्यरत राहण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

सिंहस्थासाठी नाशिक विमानतळाचा विकास करणे अपेक्षित आहे. नाशिकसाठी विमानाची कनेक्टिव्हिटी वाढविणे, यासाठी बैठकीत आढावा घेण्यात येणार असल्याचे सांगितले. प्रयागराज येथे १८ महिन्यांत टर्मिनल उभे केले असून चांगली विमानसेवा देता आली. नाशिकमध्येही उद्योग, पर्यटन, शेती, धार्मिक महत्वाचे स्थान आहे. त्यामुळे नाशिकची कनेक्टिव्हीटी वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मोहोळ यांनी सांगितले.

थोडक्यात...

जि. प. कार्यालयात पार्किंगची कमतरता

नाशिक । जिल्हा परिषद नाशिक कार्यालयात येणाऱ्या लोकांसाठी पुरेशी पार्किंग सुविधा उपलब्ध नाही. यामुळे वाहनांची गर्दी रस्त्यावर होऊन वाहतूक कोंडी निर्माण होते. याचा त्रास कर्मचारी व नागरिक दोघांनाही सहन करावा लागतो. सध्या वाहतूक शाखेतर्फे वाहने उचलण्याची प्रक्रिया सुरु आहे त्यामुळे येथे कामासाठी आलेल्या नागरिकांची वाहने टोईंग करून नेल्याने त्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. प्रशासनाने यावर कायमस्वरूपी उपाय करावा.

कर्जवाटपास परवानगी द्यावी

नाशिक । नाशिक जिल्ह्यातील पतसंस्थांचे एल.आय.सी. असाइनमेंट कर्ज वाटपास पूर्ववत परवानगी देण्यात यावी, अशी मागणी वरिष्ठ विभागीय महाप्रबंधक अजय कुमार यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली. नाशिक जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, बापूसाहेब गायकवाड, प्रशिक्षण को-ऑर्डिनेटर कैलास गायखे, विशेष निमंत्रित संचालक ज्ञानेश्वर पेहेरे यावेळी उपस्थित होते. याबाबत लवकरच सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन त्यांना देण्यात आले.

चाकूने वार

नाशिक । नाशिकरोड येथील फर्नांडिसवाडी येथे संशयित मावसभावाने जुन्या वादाची कुरापत काढत चाकूने वार करीत जखमी केल्याचा प्रकार घडला. अमन दादू रोकडे (रा फर्नांडिसवाडी, नाशिकरोड) असे संशयिताचे नाव आहे. तुषार सपन डे (२०, रा. फर्नांडिसवाडी) याच्या फिर्यादीनुसार, मंगळवारी (दि.९) रात्री साडेदहाच्या सुमारास संशयित रोकडे याने जुन्या वादाची कुरापत काढून तुषार व त्याच्या आई-वडिलांना शिवीगाळ करीत आईशी झटापट केली. त्यावेळी तुषार आईच्या मदतीला धावला असता, संशयिताने धारदार चाकूने तुषारच्या पोटावर वार केले. तसे नादाला लागलात तर बेत पाहून घेईल असा दम भरुन पळ काढला. उपनगर पोलिसात गुन्हा दाखल असून पोलिसांनी संशयिताला अटक केली आहे. सहायक निरीक्षक सुयोग वायकर तपास करीत आहेत.

दागिने लंपास

नाशिक । विहितगाव ते देवळाली कॅम्प दरम्यान रिक्षा प्रवास करीत असताना सहप्रवासी महिलांनी ज्येष्ठ नागरिकाच्या बॅगेतील दीड लाखांच सोन्याचे दागिने चोरून नेले. बळीराम शंकर एकविरे (७१, रा. बुरडगाव रोड, अहिल्यानगर) यांच्या फिर्यादीनुसार, बुधवारी (दि.१०) ते पत्नीसह देवळाली कॅम्पच्या विजयनगर परिसरात राहणाऱ्या मुलीच्या घरी जाण्यासाठी विहितगाव येथून रिक्षात बसले. त्यावेळी त्यांची बॅग त्यांनी रिक्षाच्या डिक्कीत ठेवली. रिक्षात अज्ञात तीन महिलाही होत्या. याच महिलांनी एकविरे दाम्पत्याची नजर चूकवून त्यांच्या बॅगेतून ७५ हजारांची सोन्याची चैन, ७५ हजारांचे सोन्याचे मंगळसूत्र, ४ हजारांचे चांदीचे जोडवे असा १ लाख ५४ हजारांचा ऐवज चोरला. देवळाली कॅम्प पोलिसात गुन्हा दाखल आहे.

घोड्याचे सजावट साहित्य चोरले

नाशिक । घोड्याच्या पाठीवरील सुमारे साडेअकरा हजारांचे साहित्य चोरी केल्याप्रकरणी संशयित गणेश उर्फ गौरव रमेश गारे (२०, रा. कोळीवाडा, संसरीगाव) यास अटक केली आहे. आकाश सुरेश उन्हवणे (३५, रा. जमाल सेनोटेरियम, लॅमरोड, देवळाली कॅम्प) यांच्या फिर्यादीनुसार, मार्च ते मे या दरम्यान संशयिताने घोड्याच्या पाठीवरील ८ हजारांचे चामड्याचे खोगीर, चामडी लगाम, ३ हजारांची १० किलोची लोखंडी साखळी, पाचशे रुपयांचा चामडी पट्टा असा ११ हजार ५०० रुपयांचे साहित्य संशयिताने चोरला. देवळाली कॅम्प पोलिसात गुन्हा दाखल असून, संशयिताला अटक करण्यात आली आहे.

निवृत्तिनाथांच्या पालखीचे शहरात जोरदार स्वागत

सातपूर ग्रामस्थांकडून यथोचित सत्कार

सातपूर । प्रतिनिधी

विठ्ठलाच्या दर्शनासाठी त्र्यंबकेश्वर येथून पंढरपूरकडे निघालल्या संतश्रेष्ठ निवृत्तिनाथ महाराज पालखीचा पहिला मुक्काम गेल्या अनेक वर्षांच्या परंपरेनुसार सातपूर होत आला आहे. बुधवारी निवृत्तीनाथांच्या पालखीचे आगमन नाशिक शहरात झाल्यानंतर सातपूरकरांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले.

सातपूर ग्रामवासीयामध्ये स्वागताची तयारी एक महिना अगोदरपासूनच सुरु होते. यंदाच्या स्वागतासाठी सातपूर ग्रामस्थांमध्ये उत्साह संचारलेला दिसून येत होता.

बुधवारी (दि.११) सातपूरला दिंडीचे स्वागत होणार असल्याने पालखी स्वागत समितीची स्थापना करण्यात आली. यावर्षी समितीचे अध्यक्ष नीलेश भंदुरे, कार्याध्यक्ष सुनील मौले, नितीन निगळ, तसेच गोकुळ निगळ, विजय भंदुरे, शांताराम निगळ, अमर काळे, माजी नगरसेविका सीमा निगळ, तुकाराम बंदावणे आदिंसह अन्य ग्रामस्थांचा समावेश आहे.

पालखी स्वागत समिती ग्रामस्थांच्या मदतीने बारकाईने नियोजन केले होते. पालखीतील भाविक, वारकऱ्यांची कोणतीही गैरसोय होणार नाही, याची काळजी घेतली जाते. पालखीच्या स्वागतापासून निवासाची, स्नानाची व्यवस्था, चहा, नाश्ता, सुरुची भोजन, शौचालय व्यवस्था, पिण्याचे पाणी आदिंसह सर्वप्रकारची व्यवस्था नीटनेटकी ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यात आला होता.

पालखीच्या स्वागतासाठी बँडपथक तैनात करण्यात आले होते. पपय्या नर्सरी ते सातपूर गाव अशी स्वागत यात्रा काढण्यात आली होती. यावेळी चमकीच्या कागदी झिरमीळीचा वर्षाव वारकऱ्यांवर करण्यात आला. डिजेच्या मोठ्या आवाजात हरीनामाचा गजर वारकऱ्यांमध्ये उत्साह भरत होता. त्यामुळे सातपूर

ग्रामस्थांमध्ये चैतन्याचे वातावरण पसरले होते.

संतश्रेष्ठ निवृत्तिनाथ महाराज पालखीचा पहिला मुक्काम जवळपास १५० वर्षांपासूनची परंपरा असल्याचे ज्येष्ठ नागरीक सांगत आहेत.पालखीच्या स्वागतासाठी अबालवृध्द सातपूरकर सहभाग घेत असतात. पालखीसोबत आलेल्या सर्व वारकरी आणि भाविकांचे आदरातिथ्य व स्वागत उत्साहत केले जाते.

इगतपुरी-भुसावळ मेमू रेल्वे आज रद्द

नाशिकरोड । प्रतिनिधी

भुसावळ विभागातील जळगाव, मनमाड दरम्यान तिसऱ्या मार्गाच्या जोडणीसाठी माहेजी येथे यार्ड रिमॉडेलिंगचे काम करण्यात येणार आहे. त्यासाठी गुरूवारी (दि. १२) नॉन इंटरलॉकिंग कार्य करण्यात येणार असल्याने काही रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

१२ जूनला इगतपुरी-भुसावळ मेमू आणि भुसावळ, इगतपुरी मेमू रद्द राहील. वास्को-दी-गामा-पटना एक्स्प्रेस सुमारे दीड तास, तर एलटीटी-हरिव्दार गाडी आणि एलटीटीरक्सौल एक्स्प्रेस सुमारे ४५

मिनिटे नियंत्रित करण्यात येणार असल्याचे रेल्वेने कळविले आहे.

गाडी क्रमांक १२१६५ मुंबई एलटीटी गोरखपूर एक्स्प्रेस मुंबईहून सकाळी सहाऐवजी पावणे सातला सुटेल. गाडी क्रमांक १५०१७ एलटीटीगोरखपूर एक्स्प्रेस एलटीटी येथून ०६.३५ ऐवजी ०७.३५ वाजता सुटेल.

त्र्यंबक न. पा. चे काम पारदर्शक : डॉ. देवचक्के

नाशिक । प्रतिनिधी

त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेमधील काही कामांबाबत आलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी सुरु असली तरी मुख्याधिकारी डॉ. श्रेया देवचक्के यांनी आपले कामकाज पूर्णतः पारदर्शक आणि शासन नियमांनुसार असल्याचा ठाम दावा केला आहे.

कोणतेही अपारदर्शक किंवा नियमबाह्य कार्य आपल्या काळात झालेले नसल्याचा स्पष्ट निर्वाळा त्यांनी दिला आहे. त्यांची चौकशी प्रक्रिया सुरु असून, अंतिम निष्कर्ष चौकशी अहवालानंतर स्पष्ट होईल.

त्र्यंबकेश्वरसारख्या पवित्र तीर्थक्षेत्रात विकासकाम करताना जनहित, गुणवत्ता व पारदर्शकता हेच माझे तीन प्रमुख निकष राहिले असल्याचे डॉ. देवचक्के यांनी सांगितले. काही व्यक्ती हेतुपुरस्सर चुकीची माहिती पसरवून आपली प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

दोन वर्षांत सुमारे २७५ कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मंजुरी

त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेमार्फत सुमारे २७५ कोटी रुपयांचे प्रकल्प मंजूर झाले आहेत. त्यामध्ये सिंहस्थ तयारी, स्वच्छता, रस्ते व पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत सोयीसुविधांचा समावेश आहे. सर्व कामे प्रशासनाच्या मंजुरीनंतरच राबवण्यात येत असून, कोणत्याही प्रकारची आर्थिक अनियमितता झाली नसल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गेल्या दोन वर्षांत उत्पन्नात सुमारे चार कोटींची वाढ झाली आहे. कर वसुली, नगरपरिषदेची मालमत्ता भाड्याने देणे, वाहन प्रवेश फी, पार्किंग व्यवस्थापन इत्यादी सर्व प्रक्रिया नियमानुसार राबवण्यात आल्या असून त्यामुळे शहरातील सुविधांमध्ये दर्जात्मक सुधारणा होत असल्याचे नगरपरिषदेच्या उत्पन्नाबाबत बोलताना डॉ. देवचक्के यांनी सांगितले.

करोनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा आरोग्य यंत्रणा सज्ज

नाशिक । सध्या राज्यभरात करोनने पुन्हा डोके वर काढले असल्याने राज्य सरकारने जिल्हा आरोग्य यंत्रणांना सज्ज राहण्याची सूचना दिली असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांनी दिली.

करोना रुग्ण आढळून आल्याने राज्य शासनाकडून जिल्हा आरोग्य यंत्रणेला औषधांचा साठा तपासून तयार ठेवण्याचे सांगण्यात आले आहे. यासोबतच ऑक्सिजनचा साठा देखील तयार ठेवण्याचे सांगण्यात आले आहे. कुठल्याही रुग्णाला श्वसनाचा त्रास होत असेल तर त्याला रुग्णालयात दाखल करून त्याची तत्काळ तपासणी करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. गुरुवार (दि.१२) आरोग्य मंत्र्यांची व्हिडिओ कॉंफरन्स द्वारे बठकीचे आयोजन करण्यात आले असून या बैठकीत नवीन सूचना देखील देण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तत्काळ तिकीट योजनेत सुधारणा

नाशिकरोड । प्रतिनिधी

सामान्य प्रवाशांना तत्काळ तिकीट योजनेचा लाभ सहजपणे मिळावा, यासाठी रेल्वे प्रशासनाने खालीलप्रमाणे महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत.

१ जुलैपासून तत्काळ सुविधा अंतर्गत तिकिटांची बुकिंग फक्त भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाच्या (आयआरसीटीसी) वेबसाईट किंवा मोबाईल ॲपमार्फत आधार प्रमाणीकरण केलेल्या वापरकर्त्यांव्दारेच शक्य असेल. १५ जुलैपासून तत्काळ तिकिट बुकिंगसाठी ओटीपी प्रमाणीकरण बंधनकारक असेल. या तिकीटांची बुकिंग रेल्वेच्या संगणकीकृत पीआरएस काऊंटरवर किंवा अधिकृत एजंटांमार्फत सिस्टमद्वारे पाठवलेल्या ओटीपीच्या प्रमाणीकरणानंतरच होऊ शकते. हा ओटीपी प्रवाशाने बुकिंग करताना दिलेल्या मोबाईल क्रमांकावर पाठवण्यात येईल. रेल्वेचे अधिकृत तिकीट एजंट तत्काळ बुकिंगच्या पहिल्या दिवशी सुरुवातीच्या ३० मिनिटांपर्यंत तिकीट बुक करू शकणार नाहीत. वातानुकूलित (एसी) वर्गासाठी तात्काळ तिकीट बुकिंगची परवानगी सकाळी दहा ते साडे दहा या वेळेत अधिकृत एजंटांना दिली जाणार नाही. या सुधारित तरतुदीचा उद्देश तात्काळ बुकिंग प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि सामान्य प्रवाशांना या सुविधेचा अधिकाधिक लाभ मिळवून देणे हा आहे.

त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टमध्ये कोट्यवधींचा गैरव्यवहार ?

ललिता शिंदेंचा आरोप; चौकशीची मागणी

नाशिक । प्रतिनिधी

जगप्रसिद्ध तीर्थक्षेत्र आणि १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टमध्ये कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप माजी विश्वस्त ललिता शिंदे यांनी केला आहे.

यासंदर्भात त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि नाशिक जिल्हा न्यायालयाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे निवेदन पाठवून सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

शिंदे यांनी हे संपूर्ण प्रकरण त्र्यंबकेश्वर देवस्थानच्या पवित्रतेला आणि आस्थेला धक्का पोहोचवणारे आहे. हे केवळ आर्थिक अपहार नव्हे, तर धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांवर झालेला आघात आहे. त्यामुळे या गंभीर प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शनाखाली उच्चस्तरीय न्यायिक चौकशी व्हावी, व दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी मागणी ललिता शिंदे यांनी पत्रकार परिषदेत केली.

ललिता शिंदे यांनी केलेल्या आरोपांनुसार,धर्मदाय सहआयुक्त (नाशिक) व तात्कालीन अध्यक्षांसह विश्वस्थांनी मिळून या नियुक्त्यांसाठी अवैध आर्थिक देवाणघेवाण झाल्याचे आरोप केले आहेत.

इगतपुरीतील भूसंपादनाबाबत मोठा निर्णय

जमिनीचे सर्वेक्षण करण्यास शेतकऱ्यांची संमती

नाशिक । प्रतिनिधी

इगतपुरी तालुक्यातील आडवण-पारेगाव औद्योगिक वसाहतीच्या (एमआयडीसी) भू-संपादनाबाबत शेतकऱ्यांनी प्रखर विरोध दर्शवला. याप्रकरणी नाशिक लोकसभा मतदारसंघाचे खा. राजाभाऊ वाजे यांनी शेतकऱ्यांच्या भेटी घेत प्रश्न जाणून घेत थेट उद्योगमंत्र्यांकडे बैठक लावली.

बुधवारी मंत्री उदय सामंत यांच्याकडे झालेल्या बैठकीत सदरच्या जमिनीचे सर्वेक्षण करण्यास शेतकऱ्यांनी संमती दर्शवली आहे. मात्र सर्वेक्षणानंतर भूमीहीनांसंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन सामंत यांनी शिष्टमंडळाला दिले.

आडवण-पारेगाव येथे प्रस्तावित महिंद्रा प्रकल्पासाठी सुमारे ६०० एकर जमीन आवश्यक आहे. याकरिता परिसरातील जमीनींचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थांचा जमीन देण्यास तीव्र विरोध आहे. त्यामुळे प्रशासन विरुद्ध स्थानिक असा संघर्ष उभा ठाकला आहे.

यापूर्वी प्रकल्पग्रस्तांना जिल्हाधिकारी कार्यालयावर अर्धनग्न मोर्चा काढत भूसंपादनास विरोध होता. खा. राजाभाऊ वाजे यांनी भेट घेत तातडीने उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे बैठक लावली. यावेळी झालेल्या बैठकीत २ जूनपर्यंत भूसंपादनास स्थगिती देण्यात आली.

त्यानंतर खा. वाजे यांनी पुन्हा उद्योगमंत्र्यांशी चर्चा करत बैठक आयोजित केली. त्यानुसार बुधवारी (दि.११) मुंबई येथे झालेल्या बैठकीत खा. राजाभाऊ, जिल्हाधिकारी जलज शर्मा, इगतपुरीचे उपविभागीय अधिकारी आकार पवार, एमआयडीसीचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी शेतकरयांनी आपल्या व्यथा मांडल्या.

शेतकऱ्यांचा विरोध लक्षात घेत उद्योगमंत्री सामंत यांनी सांगितले की, आपला विरोध स्वाभाविक आहे. परंतू जोपर्यंत सर्व्हेक्षण पूर्ण होणार नाही तोपर्यंत कुणाची किती जमीन जाणार याचा निश्चित अंदाज येणार नाही. जर कोणी यात भूमिहीन होणार असेल तर त्यांच्यावर अन्याय होऊ दिला जाणार नाही.

जि.प.चे तीन विद्यार्थी जेईई ॲडव्हान्स परीक्षा उत्तीर्ण

नाशिक । नाशिक जिल्हा परिषदेच्या वतीने सन २०२२ मध्ये सुपर ५० हा नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला होता. या उपक्रमांतर्गत सन २०२३ ते २०२४ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादित केले आहे.

सन २०२३-२४ बॅचमधील १५ विद्यार्थ्यांनी जेईई मेन्स परीक्षा उत्तीर्ण केली होती यातील ३ विद्यार्थी जेईई ॲडव्हान्स परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. जिल्हा परिषदेच्या वतीने सुपर ५० उपक्रम राबवण्यात येत आहे. यंदाच्या वर्षी दुसंगवाडी, वावी, ता. सिन्नर येथील हर्षल अशोक ढमाले या दिव्यांग विद्यार्थ्याने देशात ८३ वा रँक मिळवत घवघवीत यश संपादित केले आहे. सुरगाणा तालुक्यातील कुकुडणे येथील दिव्येश सावळीराम महाले या विद्यार्थ्याने २ हजार ४० वा रँक मिळवला आहे तर येवला तालुक्यातील एरंडगांव येथील अभिषेक अहिरे या विद्यार्थ्याने ५ हजार ८४६ वा रँक मिळवला आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांना महाविद्यालयीन प्रवेशासाठी देखील सर्वतोपरी मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे सांगितले.